# International Yoga Day 2022-23

## दादासाहेब रावल महाविद्यालयात योग दिवस उत्साहात साजरा:-

21 जून 2022 हा दिवस संपूर्ण जगात योग दिवस म्हणून साजरा केला. संपूर्ण मानवी सृष्टीने योग साधना च्या माध्यमातून निरोगी व प्रसन्न रहावे हा त्यामागचा मूळ उद्देश असून या उद्देशाला डोळ्यासमोर ठेवून स्वोध्दारक विद्यार्थी संस्थेच्या दादासाहेब रावल महाविद्यालयात शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडून सामूहिक पद्धतीने योग दिवस साजरा करण्यात आला. सदर उपक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.के.डी गिरासे उपप्राचार्य डॉ. के.के कापडणे कार्यालयीन प्रमुख श्री.आर. आर गिरासे प्राध्यापक प्राध्यापकेतर सर्व कर्मचारी उपस्थित होते. योग वर्गा चे प्रात्यक्षिक प्रा.एस.एफ. पावरा व प्रा.डॉ.सी.एम जाधव यांनी करून दाखविले. योग वर्गात ओमकार,प्रार्थना, शारीरिक हालचाली,आसने,प्राणायाम, ध्यानधारणा आदी आरोग्य संवर्धक कृतींचा समावेश करण्यात आला होता. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासोबतच विद्यार्थ्यांच्या शारीरिक व मानसिक विकास साधला जावा या हेतूने दादासाहेब रावल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.के.डी.गिरासे यांच्या मार्गदर्शना खाली शारीरिक शिक्षण व क्रीडा विभागाचे क्रीडा संचालक प्रा.डॉ. देवेंद्र धाकड व राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रमुख प्रा.डॉ.के एस चौधरी वर्षभर विविध उपक्रमांचे आयोजन विद्यार्थ्यांसाठी करीत असतात. या प्रसंगी प्राचार्य डॉ.के.डी गिरासे यांनी योग दिनाच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या.

www.epunyanagari.com Toll Free 18002081019

# पुण्य नगरी

जळगाव-धुळे ★ रविवार, २६ जून २०२२ ॥वर्ष : २० ॥ अंक : ३०९ ॥ पाने : १०+४=१४ ॥ किंमत : ५.००

पुण्य नगरी

SMART धुळे


रविवार, २६ जून २०२२


## रावल महाविद्यालयात योग दिवस साजरा


दोंडाईचा : स्वोध्दारक विद्यार्थी संस्थेच्या दादासाहेब रावल महाविद्यालयात शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे योग दिवस साजरा करण्यात आला.प्राचार्य डॉ. के.डी गिरासे, उपप्राचार्य डॉ. के.के कापडणे, कार्यालयीन प्रमुख आर. आर.गिरासे,शारीरिक शिक्षण व क्रीडा विभागाचे क्रीडा संचालक प्रा.डॉ. देवेंद्र



धाकड, राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रमुख प्रा. डॉ.के एस चौधरी यांच्यासह प्राध्यापक प्राध्यापकेतर कर्मचारी उपस्थित होते. योग वर्गा चे प्रात्यक्षिक प्रा.एस.एफ. पावरा व प्रा.डॉ.सी.एम जाधव यांनी करून दाखविले.




Santoshi Mata Mandir
Doctor Ambedkar Chowk
Dondaicha Bypass
RAWAL NAGAR
College Of Agriculture,Dondaicha
Google
8H79+VX3, Rawal Nagar, Dondaicha, Maharashtra 425408, India
Dondaicha
Maharashtra
India
2022-06-21(Tue) 07:09(AM)
27°C
81°F


Santoshi Mata Mandir
Doctor Ambedkar Chowk
Dondaicha Bypass
RAWAL NAGAR
College Of Agriculture,Dondaicha
Google
8H79+VX3, Rawal Nagar, Dondaicha, Maharashtra 425408, India
Dondaicha
Maharashtra
India
2022-06-21(Tue) 07:31(AM)
28°C
82°F